# <u>दिङ्मूढ</u>

अलगद तू नभातून
आलीस सखे उतरून
डौलात क्षितिजा पासून
चालत जवळ हसून ||१||

हले कमर चालताना
वळे नजर पाहताना
उडे पदर सावरताना
पडे उजेड कायेतून ||२||

कर ठेविला मम ऊरी
उमगले तू तर परी
शिरलीस थेट अंतरी
दिङ्मूढ मी तुज भेटून ||३||

– नारायण
०८/२५/२३